पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १२**

सभावृत्तांत

**दिनांक - ०४/०२/२०१५** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०४/०२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा.छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा.आर.एस.कुमार
३) मा.नेटके सुमन राजेंद्र
४) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा.जवळकर वैशाली राहुल

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये समाविष्ट करणेत आले.

विषय क्र.२) न्यायालयात सोई सुविधा व फर्निचर पुरविणेबाबत – मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) विकास नियंत्रक नियमावलीबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.आशा सुर्यवंशी                    अनुमोदक : मा.वैशाली जवळकर

मा.शहर सुधारणा समिती कार्यपत्रिका क्रमांक १२ ची सभा सोमवार दि.०९/०२/२०१५ रोजी दुपारी ३.३० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

**सभापती -** सोमवार दिनांक ०९/०२/२०१५ रोजी दुपारी ३.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १२**

सभावृत्तांत

( दिनांक ०४/०२/२०१५ ची तहकूब सभा )

**दिनांक - ०९/०२/२०१५** **वेळ - दुपारी ३.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक **०४/०२/२०१५** ची तहकूब सभा सोमवार दिनांक **०९/०२/२०१५** रोजी दुपारी **३.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा.छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा.आर.एस.कुमार
३) मा.नेटके सुमन राजेंद्र
४) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
६) मा.आसवाणी सविता धनराज
७) मा.जवळकर वैशाली राहुल

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी, मा.तुपसाखरे - उप अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक - १
दिनांक - ९/२/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.वैशाली जवळकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/ड-८/१/१५ दि.२०/०१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे पिंपळे गुरव गावाचे विकास योजनेनुसार स.नं.५१ पैकी व ५२ पैकी जागेत आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोगाचे आरक्षण प्रस्तावित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र सुमारे ४००४.७५ चौ.मी. आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव पाठविणेत आलेला असून संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे. सदर आरक्षणाचे जागेपैकी सद्यस्थितीत टी.डी.आर.च्या माध्यमातून सुमारे ३५३९.५२ चौ.मी.जागेचा ताबा महानगरपालिकेकडे आहे. सदर जागेत नाटयगृह बांधणेचे नियोजन आहे. सदर बाबत संबंधित जागा मालक यांचे मालकीचे क्षेत्र वगळून उर्वरित ३५ गुंठे जागेत नाटयगृहाचे काम करता येईल असे सह शहर अभियंता, स्थापत्य, ड प्रभाग यांनी त्यांचे दि.२३/०९/२०१४ चे पत्रानुसार कळविले आहे. तरी एकूण

आरक्षणाचे क्षेत्र ४००४.७५ पैकी महानगरपालिकेचे ताब्यात असलेले ३५३९.५२ चौ.मी.क्षेत्र सोडून बांधकामे असलेले उर्वरित सुमारे ४६५.२३ चौ.मी.क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारची कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे. तरी बाधीत मिळकतधारक व स्थापत्य ड प्रभाग यांचे मागणीनुसार मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ पैकी व ५२ पैकी मधील आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोग पैकी जागेतील सुमारे ४६५.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सूचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाही करण्याकरीता व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४० विषय क्रमांक - २

दिनांक - ९/२/२०१५

सुचक - मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी मोरवाडी येथील न्यायालयाची इमारत ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या मालकीची असून ती भाडेतत्वावर आहे. सदर इमारतीत सोयी सुविधा व फर्निचर महानगरपालिका पुरवित आहे. न्यायालयाचे इमारतीची दुरावस्था झालेली आहे. तरी सदर न्यायालयाचे इमारतीसाठी खालील सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात.

१) न्यायालयामध्ये वकील वर्ग व कर्मचारी यांना टेबल व बसण्यासाठी खुर्च्या पुरविणे.
२) न्यायालयातील केसेस ठेवण्यासाठी भिंतीमध्ये लाकडी कपाटे करुन मिळावीत अथवा लोखंडी रॅक मिळावीत.
३) इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रुफींग करुन मिळावे.
४) न्यायालयाचे इमारतीच्या खिडक्या व दरवाजे दुरुस्त करुन मिळाव्यात.
५) निकाली रेकॉर्ड ठेवण्यासाठी टेरेसवर एक रुम बांधून मिळावी.
६) न्यायालयामध्ये फरशी बसविण्यात यावी तसेच न्यायालय इमारतीस रंगरंगोटी करुन मिळावी.
७) इमारतीस नविन लोखंडी गेट बसवून मिळावे.
८) न्यायालयात आवश्यक असणारे फॅन व टयुबलाईट पुरविण्यात यावेत.
९) तसेच अनुषंगीक सोयी सुविधा पुरवण्यात याव्यात.

तरी उपरोक्त् सोयी सुविधा स्थापत्य् विभागामार्फत त्वरीत करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४१ विषय क्रमांक - ३

दिनांक - ९/२/२०१५

सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ : मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय – विकास नियंत्रण नियमावलीबाबत .....

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( छाया जगन्नाथ साबळे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९६ /२०१५
दिनांक : १०/०२/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.